REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# बहिणाबाई चौधरींच्या काव्यातील शैक्षणिक मूल्यांचा विद्यार्थ्यांनवर होणारा प्रभाव

अरुणा ल. कावळे[1] , डॉ. राजश्री वैष्णव[2]
[1]संशोधिका ,
[2]मार्गदर्शिका , विभाग प्रमुख पद्व्यूत्तर शिक्षण विभाग रा.तू.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**सारांश -**

बहिणाबाई चौधरीच्या लोक काव्यातील शैक्षणिकमूल्ये ही आजच्या परिस्थितीतील समस्या आणि अडचणींनासमोर जाण्यासाठी उपयुक्त आहे. जनमानसात सामाजिक बांधिलकीची जाणीव रुजविण्याची क्षमता काव्यामध्ये आहे. बहिणाबाई चौधरीचे काव्य मराठी माणसाला सहज बोलते करणारे आहे. तसेच मानवी मनावर सहज अक्षरशिल्प कोरणारे आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यान मध्ये आणि भावी पिढीमध्ये सामाजिक दृष्टीकोन, कौटुंबिक आपुलकी, जिव्हाळ्याची भावना निर्माण होऊ शकते. म्हणून बहिणाबाई चौधरीच्या काव्यातील शैक्षणिकमूल्ये विद्यार्थ्यानमध्ये शिक्षणाच्या माध्यमातून रुजविणे काळाची गरज आहे.



**प्रस्तावना-**

संशोधनाच्या सद्यस्थितीत अध्ययनात असे निदर्शनास आले की, शिक्षण हे नव जीवनाचे स्त्रोत आहे. त्यातील कृत्रिमता काढून सहजतेने नव जाणीव करून दिल्यास प्रत्येकास नवचेतना मिळते. सत्य-असत्य हे तत्व गवसते. विवेक समृद्ध व शक्तिशाली होते. या सर्व बाबींचा सह संबंध लोकसाहित्यातील काव्य संभाराने मानवी मनावर अक्षरशिल्प कोरणारे आहे. मराठी साहित्य विश्वाला व मराठी माणसाला सहज बोलते करणारे काव्यविश्व बहिणाबाई यांच्या काव्यातून मिळाले आहे. हे लोककाव्य आजच्या समकालीन समस्या आणि अडचणीवर मात करून माणसाला समृद्धीकडे नेण्यासाठी उपयुक्त आहे. बहिणाबाई चौधरीच्या लोकाकाव्यातील शैक्षणिकमूल्ये ही सर्व विद्यार्थानमध्ये सामाजिक बांधिलकी रुजविण्याची क्षमता ठेवणारे आहे. विद्यार्थ्यान मध्ये सामाजिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी शैक्षणिक आणि सामाजिकमूल्ये आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये कुटुंब व समाजाबद्दल आपुलकीची भावना निर्माण होऊ शकते. बहिणाबाईच्या काव्यातील मूल्यांची रुजवणूक आपण केवळ शिक्षणाच्या माध्यमातूनच करू शकतो. बदलत्या काळात मोठ्या झपाट्याने सांकृतिक, सामाजिक जीवनमूल्याचा ऱ्हास होत चालला आहे. त्याचे जतन करण्यासाठी शिक्षण हेच एकमेव माध्यम आहे. आजच्या काळातील समस्या व आव्हाने पेलण्यासाठी, विद्यार्थ्यानमध्ये शैक्षणिकमूल्य रुजविण्यासाठी व क्षमता निर्माणकरण्यासाठी बहिणाबाईचे काव्य महत्वपूर्णठरू शकते.

प्रस्तुत अध्ययनासाठी संशोधीकेने पुढील तीन काव्याची निवड केलेली आहे.

**१) मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर किती हाकला हाकला,फिरी येते पिकावर**

बहिनाबाईनी मनाला उभ्या पिकात

चरणाऱ्या ढोराची उपमा दिली आहे. ढोराला कितीही हाकला तरी तो पिकाची नासधूस करण्यासाठी परत पिकावर येत असतो. मन पाण्यावरील लाटे प्रमाणे आहे. तसेच मन वाऱ्या प्रमाणे आहे. लाटांना किवा वाऱ्याला जसे पकडता येत नाही तसे मनाला सुद्धा धरता येत नाही असे बहिणाबाई सांगतात.

**२) आला आला शेतकऱ्या,पोयाचा रे सन मोठा**
**हाती घेईसन वाट्या,आता शेंदुरले घोटा**

प्रस्तुत काव्यात बहिणाबाई असे म्हणतात, शेतकऱ्याचा सर्वात मोठा सण / उत्सव म्हणजे पोळा आहे. ज्या बैलाच्या जीवावर शेतकऱ्याची पूर्ण मदार अवलंबून असते. त्याला कधीतरी विश्रांती मिळावी म्हणून पोळ्याच्या दिवसी तरी कमीत-कमी ओझ्याविना ठेवण्यात येते. त्याची ओवाळणी घालून पूजा केली जाते. पुराणातील कथे प्रमाणे शंकरजीचे वाहन नंदी व या नंदीवरून स्वतः परमेश्वर शंकर सुद्धा पोळ्याच्या दिवसी खाली उतरले होते. यावरून असे जाणवते की बहिणाबाईच्या काव्यातून आपला पौराणिक लोक संस्कृतीचे देखील दर्शन घडते.

**३) अरे संसार संसार,जसा तावा चुल्यावर**
**आधी हाताला चटके,तव्हा मियते भाकर**

बहिणाबाईने प्रस्तुत काव्यातून सामाजिक जीवनाची कहाणी सांगितली आहे. बहिणाबाईच्या काव्याने सुखाला नकार व दुखाला होकार देत संसार केला आहे. कोणतीही उपलब्धी मिळविण्यासाठी परीश्रम करावे लागते. हेच बहिणाबाईला सांगायचे आहे.

**कार्यात्मक व्याख्या-**

**काव्य :** अर्थपूर्ण शब्दांची जुळवा -जुळव म्हणजे काव्य होय.

**शैक्षणिकमूल्ये :** व्यक्तित्व विकासाकरिता शैक्षणिक अनुभवांच्या साह्याने व्यक्ती मध्ये गुण आत्मसात केलेजाते. त्याला शैक्षणिकमूल्ये असे म्हणतात.उदा. बौद्धिक प्रामाणिकता, वस्तुनिष्ठ दृष्टीकोन, नवीन कल्पनांचा स्वीकार व नवनिर्माण क्षमता होय.

**बहिणाबाईच्या कवितेतील शैक्षणिकमूल्ये**

**शैक्षणिकमूल्ये**

**मन**
- आत्मविश्वास
- सर्जनशीलतेचा विकास
- आत्मसंयम

**पोया**
- संकृतीचे जतन
- प्राणीमात्रावर प्रेम
- उदारता
- निसर्गाबद्दल आदर

**संसार**
- परिश्रमाला महत्व
- कौटुंबिक प्रेम
- सामाजिक आत्मीयता

**आत्मविश्वास** -बहिणाबाईच्या काव्यात आत्मविश्वास हेमूल्य आढळून येते. आत्मविश्वास म्हणजे व्यक्तित्व विकास, वैचारिक विकास होय.

**सर्जनशीलतेचा विकास** –सर्जनशीलतेचा विकास हे शैक्षणिकमूल्य आढळून येते. सर्जनशीलता म्हणजे नव-नवीन कल्पनांचा विस्तार किंवा नवनिर्मिती होय. हा खरा बौद्धिक क्षमतेचा विकास होय.

**आत्मसंयम** – बहिणाबाईच्या काव्यात आत्मसंयम हे मूल्य आढळून येते. आत्मसंयम म्हणजे मनावर व इद्रीयावर ताबा मिळविणे होय.

**संस्कृतीचे जतन** –बहिणाबाईची पोया ही कविता म्हणजे 'पोळा' ही कविता होय. या कवितेतून संस्कृतीचे जतन व संवर्धन हे मूल्य मांडण्यात आले. तसेच काव्यातून भारतीय संकृतीचे दर्शन घडून येते.

**प्राणीमात्रावर प्रेम** –बहिणाबाईच्या काव्यामध्ये प्राणी मात्रावर प्रेम करावे हे शैक्षणिकमूल्ये आढळून येते. या काव्यात बैलाची पूजा (प्राणी पूजा) याचे महत्व सांगितलेले आहे.

**उदारता** – मानवी मनातील उदारता हे शैक्षणिकमूल्य या कवितेतून दिसून येते.

**निसर्गप्रेम** – मानवी जीवन निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे निसर्गाविषयी प्रेम त्याचे संरक्षण व संवर्धन या काव्यातून सांगितले आहे.

**परिश्रमाला महत्व** –परिश्रमाला महत्व बहिणाबाईची कविता सांगते. जीवनात परिश्रम, कष्ट केल्या शिवाय कुठलीच गोष्ट/ वस्तू साध्य करता येत नाही.

**कौटुंबिक प्रेम** –कुटुंब प्रेम हे शैक्षणिकमूल्य बहिणाबाईच्या कवितेत आढळून येते. मानवी विकासाच्या दृष्टीकोनातून कुटुंब संस्था अत्यंत महत्वाची आहे. त्यातील जिव्हाळा, प्रेम कवितेत सांगितले आहे.

**सामाजिक आत्मीयता** –मानव हा सामजिक प्राणी आहे. समाजात राहून त्याचा सर्वांगीण विकास होत असतो. त्यामुळे सामाजिक आत्मीयता ही असणे गरजेचे आहे. हेच शैक्षणिकमूल्य बहिनाबाईचे काव्य सांगते.

## सकारत्मक प्रभाव

बहिणाबाईचे काव्य मराठी मातीला समृद्ध करीत मराठी भाषा, संस्कृती, सभ्यता याचा परिपाक मानवी मनात रुजवीत आहे. आज या लोककाव्याने समाज मनात शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून अमुल्य तत्व पेरले आहे. या काव्याची गनिमा अनन्य साधारण असून त्याची उंची गगनाला भिडणारी आहे. शिक्षण व शैक्षणिकमूल्य यातील दुवा साधण्याचे महत्तम कार्य या काव्यांनी केले आहे. माणूस घडविण्याच्या हेतूने हे काव्य विविधांगी स्वरूपातून काळपरत्वे कार्यान्वित असलेले दिसते. आधुनिक काळातील शिक्षण प्रणाली समजून घेतांना बहिणाबाईच्या लोककाव्याचा उपयोग करणे म्हणजे शिक्षणात सहजता निर्माण करणे होय. वरील सर्व मूल्ये याच घटकासी संघीकृत आहेत. मानवी जीवन विविध पैलूनी जुडलेले आहे.ज्ञान ग्रहण करतांना औपचारिक व अनौपचारिक तत्वांचा विचार करणे आवश्यक आहे. बहिनाबाईचे लोककाव्य या दोन्ही दृष्टीकोनातून समृद्ध करणारी आहे. शैक्षणिकमूल्यांची भारघोष उधळण जीवनाला अनुभव संपन्न करणारी आहे.

शैक्षणिकमूल्यांचा संबध प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शिक्षणाशी व जीवानाशी आहे. शैक्षणिक दृष्टीकोनातून काव्याकडे पाहिले तर समता,स्वातंत्र, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता ही संविधानिकमूल्ये अवतरली आहे. म्हणून या काव्यातून विद्यार्थी जीवनावर/ मनावर सकारात्मक प्रभाव होतो. याचे महत्व आध्यात्मिक पण आहे. आजच्या युगातील विद्यार्थी भरकटत चालला आहे. म्हणून या शैक्षणिकमूल्यांच्या माध्यमातून आजचे विद्यार्थी आणि भावी पिढीत सकारात्मक बदल घडवून आणता येईल.

## शैक्षणिक उपयोजन –

•मूल्यांची रुजवणूक होण्यासाठी भाषा शिक्षणातील लोककाव्याला प्रोत्साहन दिल्यास मूल्यांची रुजवणूक होऊ शकते.

•विद्यार्थ्यानमध्ये जीवन कौशल्याचा विकास काव्याच्या माध्यमातून होऊ शकतो.

•विद्यार्थ्यानमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी बहिणाबाईचे लोककाव्य उपयुक्त आहे. परंतू ते माध्यमिक व उच्चमाध्यमिक स्तरावर अभ्यासक्रमात असणे आवश्यक आहे.

•काव्यमूल्य रुजवणूकीतून विद्यार्थ्यान मधील नैराश्य भावनेचा नाईनाट होऊ शकतो.

•विद्यार्थांमध्ये परिश्रमाचे महत्व कळू शकते.

•आजच्या पिढीतील सामाजिक भावना ही खालावत चालली आहे. या लोककाव्याच्या माध्यमातून ही पोकळी भरून काढण्यासाठी मदत होईल.

•बहिणाबाईच्या काव्यातून जीवन निष्ठा प्रकट झाली आहे. याचा उपयोग विद्यार्थ्यांना होऊ शकतो.

## संदर्भ सूची

१) चौधरी बहिणाबाई – (१९६९) बहिणाबाईची गाणी दुतीय आवृत्ती
२) चौधरी बहिणाबाई – (१९७२) बहिणाबाईची गाणी तृतीय आवृत्ती
३) नाईक शोभा - (१९९०) बहिणाबाई चौधरी यांची कविता – दर्या प्रकाशन पुणे.
४) चौधरी स्नेहलता –(२००२) भूमिकन्या बहिणाबाई चौधरी एक चिंतन – कॉंटीनेटल प्रकाशनपुणे.
५) सबाने अरुणा –(२००७) बहिणाबाई चौधरी – आकांक्षा प्रकाशन कोतवाल नगर नागपूर.
६) वडीखाये रेखा – भूमिकन्या बहिणाबाई चौधरी – विद्या प्रकाशन नागपूर.
७) जगनाडे रेखा – निसर्गकन्या बहिणाबाईचे काव्यशिल्प – विजय प्रकाशन पुणे.
८) चीडगोपकर अलका - बहिणाबाईची गाणी एक काव्यदर्शन